**उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांचे कार्यालय**
पत्रक्र.उविअ/कलि पो.पा.आस्था/कावि/ /2018
Phone no. 07137-272370
E-mail Id- sdodesaiganj@gmail.com
दिनांक :-03 डिसेंबर, 2018

**आदेश**

उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय देसाईगंज(वडसा) अंतर्गत देसाईगंज व आरमोरी तालुक्यातील पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्याकरिता अर्हताधारक उमेदवारांकडून दिनांक 6.11.2018 रोजीच्या जाहीरातीद्वारे अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन पात्र व अपात्र अर्जदारांची यादी दिनांक 30 नोव्हेंबर, 2018 रोजी http://desaiganj.govbharti.in या संकेतस्थळावर व उपविभागीय अधिकारी कार्यालय, देसाईगंज(वडसा)/ तहसिल कार्यालय, देसाईगंज(वडसा)/तहसिल कार्यालय, आरमोरी चे नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आली. या यादीमध्ये सौ. संतोषी यशवंत मांडवे, रा.चोप यांचा अर्ज पात्र करण्यात आला होता. सदर पात्र अर्जावर सौ. सुलोचना त्र्यंबक भजने रा. चोप यांनी आक्षेप अर्ज दाखल केला. तपासणीअंती मौजा चोप येथील **भ.ज.क. (महिला) आरक्षण असून संतोषी यशवंत मांडवे यांनी अर्जामध्ये आपल्या जातीचा प्रवर्ग इतर मागास वर्ग असा नमूद केलेला आहे. सदर अर्ज नजरचुकीने पात्र करण्यात आला. तरी संतोषी यशवंत मांडवे यांचा अर्ज या आदेशाद्वारे अपात्र करण्यात येत आहे.**

उपविभागीय दंडाधिकारी, देसाईगंज
तथा अध्यक्ष
(पो.पा.पदभरती निवड समिती)

Scanned by CamScanner